# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

## तक्रार अर्ज क्र. ४१/२०१८ ते ४३/२०१८

१.श्री. सादिक गुलमहंमद शेख
२. श्री. उत्तम बळवंत पाटील
३. श्री. आनंदा चंदु जाधव
} तक्रार अर्जदार

विरूध्द

१.प.पू. स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, शिराळा
२.बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड
} वि. प

## तक्रार अर्ज क्र. ४४/२०१८ ते ४६/२०१८

४. श्री. रामराजे हणमंतराव माने
५. श्री. हेमंत राजाराम सावंत
६. श्री. सुनिल साधु घोलप
} तक्रार अर्जदार

विरूध्द

१.प.पू. स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, शिराळा
२.विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, कोकरूड
} वि. प.

**तक्रारीचे स्वरूप :**

परमपुज्य स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था शिराळा, जि. सांगली या संस्थेच्या बाबा नाईक महाविद्यालय कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली, व विश्वासराव नाईक कला, वाणिज्य, आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, ता. शिराळा, जि. सांगली या दोन्ही महाविद्यालयातील तक्रारदार शिक्षक यांनी तक्रार निवारण समितीकडे पूर्णवेळ अधिव्याख्याता पदाचे थकीत वेतन व्याजासह मिळणेकरिता

स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारदार शिक्षक यांची माहिती खालीलप्रमाणे :—

श्री. सादिक गुलमहंमद शेख दि. ३१/०८/१९९८ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत हिंदी विषयाकरिता पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली येथे कार्यरत होते.

श्री. उत्तम बळवंत पाटील दि. २१/१२/२००६ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत इंग्रजी विषयाकरिता पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा. जि. सांगली येथे कार्यरत होते.

श्री. आनंदा चंद्रु जाधव दि. ३१/०८/१९९८ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत अर्थशास्त्र या विषयाकरिता पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा, जि. सांगली येथे कार्यरत होते.

श्री. रामराजे हणमंतराव माने दि. २०/०६/१९९९ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत रसायनशास्त्र विषयाकरिता पूर्णवेळ पदावर अधिव्याख्याता म्हणून विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा, जि. सांगली येथे कार्यरत होते.

श्री. हेमंत राजाराम सावंत दि. २०/०६/१९९९ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत भूगोल विषयाकरिता पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, कोकरूड, ता. शिराळा येथे कार्यरत होते.

श्री. सुनिल साधू घोलप दि. २०/०६/१९९९ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंत वनस्पतीशास्त्र विषयाकरिता पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व

बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, ता. शिराळा, जि. सांगली येथे कार्यरत होते.

तक्रारदार शिक्षक यांनी समितीसमोर दिलेले म्हणणे खालीलप्रमाणे प.पू. स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरूड व विश्वासराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय येथे उपरोक्त तारखेपासून कार्यरत होते. शिवाजी विद्यापीठाकडून पूर्णवेळ पदाची मान्यता आहे. महाविद्यालयाने पूर्णवेळ पदाचा कार्यभार देवून वेतनश्रेणीमध्ये रू. ८००० यानुसार नियुक्ती आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाचा याचिका क्र. ११७२/२००२ मधील आदेशानुसार त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात आली व शासन पत्र दि. २६/०६/२००९ नुसार त्यांची सेवा तदर्थ करण्यात आली असे असताना पूर्णवेळ पदाचा नेमणूक आदेश, विद्यापीठाची पूर्णवेळ पदाची मान्यता व कार्यभार असताना देखील संस्थेने सीएचबीनुसार वेतन दिले आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी सन २००६ पासून सन २०१५ पर्यंत पूर्णवेळ पदाचे काम केले आहे. तरीही पूर्णवेळ पदाचे वेतन बॅंक खातेवर जमा केलेले नाही. शिक्षकांचे वेतन देणेही संस्था व महाविद्यालयाची जबाबदारी आहे.

तक्रारदार शिक्षक यांनी शासनपत्र बी.यु.सी दि. २६ जून २००९ नुसार विद्यापीठात जा. क्र. शि. वि. एम. ए. के. /१३७२५ दि. १५/०३/२०१० च्या पत्राने दिलेली तदर्थ मान्यता सादर केली आहे. सदर मान्यतेनुसार संस्थेने दि. ०५/०५/२०१० रोजी सेवा पुढे ठेवत असलेबाबत दिलेले नेमणूक आदेश दाखल केले आहेत. विद्यापीठ मान्यता पत्रामध्ये पूर्णवेळ मान्यता असा उल्लेख केला आहे, त्यानुसार पूर्णवेळ काम केले आहे, तरी महाविद्यालयाने मा. सहसंचालक उच्च

शिक्षण कोल्हापूर यांच्याकडून सीएचबी मान्यता घेतली आहे. तदर्थ मान्यतेनुसार वेतन देणेबाबत तक्रारदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याचे मांडले. यातील काही तक्रारदार यांनी सेवेत आल्यानंतर शैक्षणिक पात्रता धारण केले आहे, तरीदेखील संस्था व महाविद्यालय यांनी दिलेले नेमणूक आदेश व विद्यापीठ मान्यतानुसार पूर्णवेळचे वेतन अदा केलेले नाही. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याचिका क्र. ११७२/२००२ मधील दि. १८/०४/२००२ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदार यांच्या, युजीसीकडून नेट सेट सुटीच्या प्रस्तावाबाबत निर्णय होईपर्यंत त्यांना सेवेत ठेवून त्यांचे मागील वेतन अदा करणेबाबत आदेश दिले असताना संस्थेने त्यांना कार्यमुक्त केले आहे. वेतन देणे ही संस्था, महाविद्यालयाची प्राथमिक व विधीवत जबाबदारी असलेचे त्यांनी मांडले.

संस्थेतर्फे सचिव व महाविद्यालयातर्फे प्राचार्य यांनी समितीसमोर लेखी म्हणणे सादर केले.

१. सदर शिक्षकाची विद्यापीठाच्या विहीत निवड समितीमार्फत निवड झालेली नाही.
२. सदर शिक्षकांनी अधिव्याख्याता पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता नेट सेट पूर्ण केलेली नाही. दि. २६ जून २००९ चा शासन आदेश रद्द करून संबंधित शिक्षकांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात, असे पत्र शासनाकडून संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना काढणेत आले. सन २०११—१२, २०१२—१३, २०१३—१४, २०१४—१५ या कालखंडात संस्थेने कोणताही नियुक्ती आदेश दिलेला नाही व विद्यापीठ मान्यताही नाही परंतु, शासनाने मात्र सदर शिक्षक विहीत निवड समितीमार्फत नियुक्त नसलेने व शैक्षणिक अर्हता धारक नसलेने त्यांची पद/कार्यभार मान्यता

ही सीएचबीनुसार मंजूर करून त्याप्रमाणे वेतन मंजूर केले आहे. तसेच मा. ट्रिब्युनल कोर्ट, पुणे यांनी सदर शिक्षकांचे वेतनाबाबतचे म्हणणे फेटाळले आहे.

३. तसेच विद्यापीठाने जरी त्यांना पूर्णवेळ मान्यता दिली असली तरी ती शासन मान्यता अंतरावर दिलेली असून शासनाची मान्यता ही तासिका तत्वावर असून त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा केले आहे असे उपरोक्त प्रमाणे संस्था व महाविद्यालयातर्फे लेखी म्हणणे मांडले आहे.

समितीने दोन्ही पक्षांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पाहणी केली असता सन २००७—०८, २००८—०९, २००९—१० चे तक्रारदार यांना दिलेले नियुक्ती आदेश संदिग्ध आहेत. त्यामध्ये पूर्णवेळ/सीएचबी असा उल्लेख आहे. तथापि विद्यापीठाची पूर्णवेळ मान्यता दिसून येते. दि. ०५/०५/२०१० रोजीच्या नियुक्ती आदेशामध्ये पूर्णवेळ असे नमूद केले आहे व विद्यापीठाची दि. ०६/०३/२०१० च्या पत्रान्वये त्यांची सेवा शासन निर्णय व शासन पत्रामध्ये नमूद केलेल्या अटींच्या व शर्तीच्या अधिन राहून तसेच शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांचेकडून वेळोवेळी होणाऱ्या निर्णयांच्या अधिन राहून त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिसून येते. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. १९७२/२००२ मधील आदेश या कामी दाखल केले आहेत.

संस्थेचे म्हणण्यानुसार, विद्यापीठाने जरी तक्रारदार शिक्षकांना पूर्णवेळ मान्यता दिली असली तरी ती शासन मान्यता अंतरावर दिलेली असून शासनाची मान्यता ही तासिका तत्वावर असून त्याप्रमाणे त्यांना वेतन अदा केले आहे. हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही, कारण प्रस्ताव पाठविणेची कार्यवाही संस्था, महाविद्यालयाकडून होते. प्रस्तावासोबत दिलेले

माहिती व कागदपत्रांवरून शासन मान्यता देणेची कार्यवाही करते

## निर्णय

सदर तक्रारदारांच्या तक्रारीमध्ये साम्य असून त्यांना विद्यापीठाच्या पूर्णवेळ पदाचे नियमानुसार वेतन मिळालेले नाही, म्हणून नियमित व रितसर वेतन मागील थकीत वेतनासह मिळणेकरिता तक्रार अर्ज दाखल केले आहेत. या तक्रारींपैकी तक्रार अर्ज क्र. ४१/२०१८ ते ४३/२०१८ मधील तीन अर्जदार यांचे मुळ अर्ज दि. २०/१२/२००६ पर्यंतचे नियमित व रितसर वेतन फरकासह अदा करण्याबाबत आदेश होणेबद्दलचा केलेला होता. तो यापूर्वी मंजूर करण्यात आलेला आहे, तथापि प्रस्तुत तक्रारीमध्ये उपरोक्त तक्रारदारांनी दि. २१/१२/२००६ पासून दि. ०७/०६/२०१५ पर्यंतचे पूर्णवेळ पदाचे वेतन मागणी केली आहे. त्यानुसार या तीन तक्रारदारांना वेतन अदा होणे आवश्यक आहे. तसेच तक्रार अर्ज क्र. ४४/२०१८ ते ४६/२०१८ मधील तीन अर्जदार यांचे मुळ अर्ज दि. २२/१२/२००६ पर्यंतचे नियमित व रितसर वेतन फरकासह अदा करण्याबाबत आदेश होणेबद्दलचा केलेला होता. तो यापूर्वी मंजूर करण्यात आलेला आहे, परंतु प्रस्तुत तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी दि. २१/१२/२००६ पासून दि. ०७/०६/२०१५ पर्यंतचे पूर्णवेळ पदाचे वेतन मागणी केली आहे. सबब या तिन्ही तक्रारदार यांना दि. २३/१२/२००६ ते दि. ०७/०६/२०१५ पर्यंतचे वेतन अदा होणे आवश्यक आहे. सबब समिती खालीलप्रमाणे निर्णय पारित करते,

सर्व तक्रारदार यांचे तक्रारअर्ज मंजूर करणेत येत आहेत. तक्रारदार शिक्षक यांचे उपरोक्त नमूद कालावधीमधील पूर्णवेळ अधिव्याख्याता पदाचे थकीत वेतन संस्था व महाविद्यालयाने अदा करावे. सदर रक्कम ही आदेश प्राप्त झाल्यापासून एक

महिन्यात संबंधितांना वेतन फरकासह अदा करण्यात यावी, असे आदेश देण्यात येत आहेत.

समितीच्या आदेशाच्या प्रती तक्रारदार शिक्षक, संस्था तसेच प्राचार्य यांना देण्यात यावी.

दि. २४/०१/२०१९

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

अध्यक्ष
श्री.एन.जी. पाटील

सदस्य
श्री. पी.डी.राऊत

सदस्य
श्री. ए.ए. कुलकर्णी

सदस्य
श्री. एन.बी. गायकवाड

सदस्य
श्री. व्ही.डी. नांदवडेकर

सदस्य सचिव
श्रीमती. ए.ए.कदम